I. 0 50



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** जिन्तूर **Year (वर्ष):** 2021
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0057 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/03/2021 20:00 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 01/03/2021
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/03/2021
**Time From (वेळेपासून):** 14:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/03/2021 **Time (वेळ):** 19:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 031 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/03/2021 19:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महावितरण उप विभाग कार्यालय , जिंतुर ,जिंतुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** जिन्तूर
**District(State) (जिल्हा(राज्य)):** परभणी(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** मुंजाजी मारोतराव भोंडवे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | दुधनगाव,जिंतुर ,बोरी,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | दुधनगाव,जिंतुर ,बोरी,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9834318853

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुधाकर दगडुजी जाधव | | | 1. प्लॉट नं54 होणाजी नगर, जटवाड ,रोड हर्सुल औरंगाबाद,औरंगाबाद,हर्सुल पोलीस स्टेशन,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | बालासाहेब विनायक बुधवंत | | | 1. आनंद नगर जिंतूर,जिंतुर ,जिन्तूर, परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पो.स्टे.जिंतुर जि.परभणी

दिनांक 01/03/2021मी मुंजाजी मारोतराव भोंडवे वय 25 वर्षे व्यवसाय शेती रा.दुधनगाव ता.जिंतूर, परभणी मो.नं. 9834318853.मी फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असून शेती करतो तसेच सोलार पंप बसवण्याचे काम करून त्यावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतो.दि. 17/02/2021 रोजी मी सौ.सिमा नितीनराव पवार रा.आसेगाव ता.जिंतूर यांचे शेतामध्ये सोलार पंप बसविलेला आहे. तसेच श्री. बाबराव ज्ञानोबा भोंडवे रा.दुधनगाव ता.जिंतूर यांचे शेतामध्ये सोलार पंप बसविण्याचे काम सुरू आहे. सौ.सिमा नितीनराव पवार रा.आसेगाव ता. जिंतूर यांचे काम पुर्ण झाल्याने त्याबाबचे फोटो, आय.सी.आर.फॉर्म, पुर्ण भरून संचीका तयार करून त्यावर गावचे लाईनमन यांची स्वाक्षरी घेतली आहे. सदर संचीकेवर महावितरणचे इंजिनिअर यांची मंजुरीसाठी अंतिम स्वाक्षरी घ्यावी लागते. त्यानंतर मला माझे केलेल्या कामाचे बिल मिळते म्हणून मी वर नमुद कामाची संचिका तयार करून त्यावर स्वाक्षरी घेण्यासाठी महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर श्री.जाधव यांचेकडे गेलो असता त्यांनी मला प्रत्येक संचिकेवर स्वाक्षरी करण्यासाठी 500/- रू याप्रमाणे दोन संचीकेसाठी 1000/- रू लाचेची मागणी केली आहे. सदर महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर श्री.जाधव यांना मी पैसे दिले नाही तर ते माझे संचीकेवर स्वाक्षरी करणार नाहीत व मला माझे केलेल्या कामाचे बिल मिळणार नाही या भितीने मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवून आपणाकडे तक्रार देण्यासाठी आलो आहे. अशा आशयाची दि. 18/02/2021 रोजी ऐ.सी.बी.कार्यालय परभणी येथे तक्रार दिली होती. त्यावरून पोलीस निरीक्षक कडु यांनी तात्काळ दोन शासकीय पंच म्हणुन 1) श्री. गणेश शिवाजी करे वय 32 वर्ष व्यवसाय वनरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय परभणी 2) श्रीमती. स्वाती बालाजी भताने वय 30 वर्ष व्यवसाय वनरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय परभणी यांना पत्रक देवून बोलावून घेतले. दोन्ही पंचांची व माझी ओळख करून देण्यात आली. मी त्यांना माझी तक्रार तोंडी कथन करून माझी टंकलिखीत तक्रार पोलीस निरीक्षक कडु यांनी पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचून सदर तक्रारीवर पो.नि.कडु व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर दि. 18/02/2021 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये महावितरण कार्यालय जिंतुर येथे आलोसे श्री.जाधव व कर्मचारी बुधवंत यांची पंच क्र.1 यांचे समक्ष भेट घेतली. तेंव्हा आलोसे महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर श्री.जाधव व कर्मचारी बुधवंत यांनी मला लाभार्थी सौ.सिमा नितीनराव पवार रा.आसेगाव ता. जिंतूर यांचे आय.सी.आर.फॉर्मवर स्वाक्षरी केल्याबद्दल व दुस-या एका आय.सी.आर.फॉर्मवर स्वाक्षरी करण्यासाठी असे एकुण दोन आय.सी.



Scanned with CamScanner

आर.फॉर्मसाठी प्रत्येकी 500/- रू या प्रमाणे 1000/- रू लाचेची मागणी केली व सदर पैसे दुस-या आय.सी.आर.फॉर्मवर स्वाक्षरीसाठी आणतेवेळेस घेवून येवून सदरची रक्कम बुधवंत यांचेकडे देण्यास सांगीतले. सदर पडताळणी दरम्यानचे महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर श्री.जाधव, कर्मचारी बुधवंत व माझ्यात पंच क्र.1 यांचे समक्ष झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. ते मेमरी कार्ड पोलीस निरीक्षक कडु यांनी ताब्यात घेतले आहे. तसेच महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर आलोसे श्री.जाधव यांनी स्वाक्षरी करून शिक्का मारलेला आय.सी.आर.फॉर्म छायांकीत प्रत करून (एकुण 5 पाने) पंचासमक्ष जप्त केला आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा दि. 18/02/2021 रोजी करण्यात आला आहे. माझा उर्वरीत आय.सी.आर. फॉर्म हा अपुर्ण असल्याने सदर आय.सी.आर. फॉर्म तयार करून पुर्ण झाल्यानंतर मी ज्या दिवशी आपणास फोन करील त्या दिवशी आलोसे महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर श्री.जाधव व कर्मचारी बुधवंत यांचेवर सापळा आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर दि. 01/03/2021 रोजी मी आपणास संपर्क करून बाबाराव भोडवे यांच्या आय.सी.आर फॉर्मचे काम पुर्ण झाले असून सापळा कार्यवाहीसाठी जिंतुर येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आपण सर्व सापळा पथक असे अदाजे दुपारी 01.00 वाजेच्या दरम्यान जिंतुर येथे शासकीय वाहनाने आलात. त्यानंतर शासकीय वाहनामध्ये सापळापुर्व कार्यवाही दरम्यान मी ए.सी.बी.कार्यालय परभणी येथे लाच म्हणून देण्यासाठी जमा केलेले 1000/- रू. नोटांचे क्रमांक पंचासमक्ष नोंद केले. अँथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लम्पचे गुणधर्म व वापरा बाबत पंच व मला माहिती देण्यात आली. त्याबाबत पोना कुलकर्णी यांचेकडुन प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. पोना कुलकर्णी यांनी लाचेची रक्कम 1000/- रू. ( 500/- रू.दराच्या 02 चलनी नोटा ) नोटांना अँथ्रॉसीन पावडर लावुन माझे शर्टच्या छातीवरील डाव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवुन दिली व आलोसे महावितरण बोरी उप विभागचे इंजिनिअर श्री.जाधव व कर्मचारी बुधवंत यांच्या भेटी दरम्यान त्यांनी मागणी करून लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सदर कार्यालयाच्या बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा रितीने डोक्याचा रूमाल सोडुन गळ्यात टाकुन लाच स्विकारल्याबाबत इशारा करण्याचे मला सांगीतले व आपण मला, पंच व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच क्रं 01 असे माझे मोटारसायकलने आमच्या पाठोपाठ पंच क्रं 02, पोनि कडु व सापळा पथक असे शासकीय वाहनाने उप विभाग, महावितरण कार्यालय जिंतूर येथे जाण्यासाठी मैनापुरी माळ येथे थांबलेल्या ठिकाणापासुन रवाना झालो. मी पंच क्र.01 श्री. करे यांचेसह आलोसे श्री.जाधव व कर्मचारी बुधवंत यांची भेट घेण्यासाठी महावितरण कार्यालय उप विभाग जिंतुर येथे गेलो आमचे पाठोपाठ पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे पाळतीवर होते. तेथे जाधव साहेब नसल्याचे मला समजले. त्यामुळे मी कर्मचारी श्री.बुधवंत यांना माझे कामाबाबत बोललो असता श्री.बुधवंत यांनी जाधव साहेब नसल्याने माझ्या उर्वरीत आय.सी.आर.फॉर्मवर सही घेवून देण्यासाठी माझा आय.सी.आर.त्यांच्या बगमध्ये ठेवला व मागील सही केलेल्या आय.सी.आर फॉर्मचे व नमुद आय.सी.आर फॉर्मचे प्रत्येकी 500 रू याप्रमाणे 1000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर मी सापळापुर्व कार्यवाहीमध्ये सांगीतल्याप्रमाणे पुर्वनियोजीत ईशारा केला. त्यावरून सापळा पथकाने लगेच उप विभाग, महावितरण कार्यालय जिंतूर येथे येवुन श्री.बुधवंत यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले व तेथे कक्षामध्ये कार्यवाही करून त्या दरम्यान माझा आय.सी.आर फॉर्म श्री.बुधवंत यांचे कडुन जप्त केला. त्यानंतर आपण सर्व पो.स्टे.जिंतुर येथे जावून पुढील कार्यवाही केली.त्यानंतर आपणास मिळालेल्या माहितीनुसार आपण श्री.जाधव यांचे रूमवर जावून त्यांना ताब्यात घेवून पो.स्टे.जिंतुर येथे घेवून आलात.सापळा कार्यवाही दरम्यान माझेत व कर्मचारी श्री.बुधवंत यांचेमध्ये झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. ते ध्वनिमुद्रीत संभाषण Sandisk 16 GB Micro SDHC मेमरी कार्ड पोनि कडु यांनी जप्त केले आहे. तसा सविस्तर सापळा पुर्व व सापळा पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला आहे. तरी मला दि. 18/02/2021 रोजी आलोसे क्र.1) सुधाकर दगडुजी जाधव वय 46 वर्षे व्यवसाय सहायक अभियंता, वर्ग-2 महावितरण शाखा कार्यालय जिंतुर ग्रामीण-2 (बोरी) रा. प्लॉट नं.54 होणाजी नगर, जटवाडा रोड हर्सुल औरंगाबाद यांनी 1) सौ.सिमा नितीनराव पवार रा.आसेगाव ता.जिंतूर 2) बाबाराव ज्ञानोबा भोंडवे रा.दुधनगाव यांचे दोन आय.सी.आर.फॉर्मवर स्वाक्षरी करण्यासाठी प्रति फॉर्म 500 रू याप्रमाणे दोन आय.सी.आर.फॉर्मसाठी 1000 रूपये लाचेची मागणी केली व आलोसे क्र.2) बालासाहेब विनायक बुधवंत वय 31 वर्षे व्यवसाय कंत्राटी बाहयस्त्रोत तंत्रज्ञ रा.आनंद नगर जिंतूर जि.परभणी यांनी सदर लाचेची रक्कम आलोसे क्र.1 यांना देण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यानंतर सदर लाचेची रक्कम आलोसे क्र.1 यांचेसाठी आलोसे क्र.2 यांनी उप विभाग, महावितरण कार्यालय जिंतूर येथे आज दि. 01/03/2021 रोजी 14.24 वा पंच क्र.1 यांचे समक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी आलोसे क्र.1) सुधाकर दगडुजी जाधव वय 46 वर्षे व्यवसाय सहायक अभियंता, वर्ग-2 महावितरण शाखा कार्यालय जिंतुर ग्रामीण-2 (बोरी) रा. प्लॉट नं.54 होणाजी नगर, जटवाडा रोड हर्सुल औरंगाबाद, आलोसे क्र.2 बालासाहेब विनायक बुधवंत वय 31 वर्षे व्यवसाय कंत्राटी बाहयस्त्रोत तंत्रज्ञ रा.आनंद नगर जिंतूर जि. परभणी यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. मी ती वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष फिर्याद दिली
सही ( अमोल कडु ) पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.परभणी.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SHIVSAMBH ISHWAR SWAMI(SI (Sub-Inspector)) / **or (किंवा)** 1234

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** आ.पो.नि. अमोल कडु सा. ला.प्र.वि.परभणी
**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SHIVSAMBH ISHWAR SWAMI
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 1234

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे जिंतूर

Scanned with CamScanner